महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान
राज्य प्रकल्प संचालनालय (रुसा)

युनिट क्र. ७, १९ वा माळा, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर-१,
कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.

ई-मेल- spdrusamah@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२-२२१६०९४३/५९

मनीषा वर्मा, भा.प्र.से.
संचालक

क्रमांक- प्रसं/रुसा/आदेश/२०१६-१७/ 376 दिनांक- 9/०९/२०१६

कार्यालयीन मंजूरी आदेश :

विषय :- राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) या योजनेअंतर्गत राज्य हिश्श्याच्या निधी वाटपास व करावयाच्या कामांना मंजूरी देणेबाबत.

संदर्भ :- १) केंद्र शासनाचे पत्र क्र. F No. २४-३७/२०१४-U.Policy(MHIGUIGC-Gen/SC/ST) दि. २९ Sept. २०१५.

२) केंद्र शासनाचे पत्र क्र. F No. २४-३७/२०१४-U.Policy(MHIGUIGC-Gen/SC/ST) dated ३० डिसेंबर २०१५.

३) शासन निर्णय क्र. रुसायो-२०१५/२३२/विशि-२(३), दि. १६ जून, २०१६.

प्रस्तावना -

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत राज्यास विविध घटकासाठी आतापर्यंत रुपये ३७ कोटी ७८ लक्ष रुपयायाचा निधी केंद्र शासनाकडून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात प्राप्त झाला आहे. दि. १६ जून, २०१६ च्या शासन निर्णयाद्वारे सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील राज्य हिश्श्याचा उर्वरीत रु. २.५६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर निधी संबंधित विद्यापीठास वितरीत करण्याची बाब संचालनालयाच्या विचाराधीन होती. यापूर्वी ९ अकृषी विद्यापीठांना रु. ४.७२ कोटी इतका निधी भौतिक सायी सुविधा या घटकांतर्गत दि. २९ व ३० मार्च, २०१६ च्या आदेशान्वये वितरीत करण्यात आला आहे. राज्य हिश्श्याची प्राप्त झालेली रक्कम प्रती विद्यापीठास रु. २८.०० लक्ष या सम प्रमाणात वितरीत करण्यास व करावयाच्या कामास खालील तपशीलाप्रमाणे मंजूरी देण्यात येत आहे.

अ.क्र.	विद्यापीठाचे नाव	वितरीत करावयाचा निधी	आत्तापर्यंत वितरीत करण्यात आलेल्या निधीमधून प्रत्यक्ष उपलब्ध असणाऱ्या निधीमधून करावायाच्या कामाची रक्कम	उपलब्ध असणाऱ्या निधीमधून करावयाच्या कामाचा तपशील
१	डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद	२८,००,०००/-	१६,८६,२२९/-	मुलांचे वसतिगृहाचे नुतनीकरण
२	सोलापूर विद्यापीठ, सोलापूर	२८,००,०००/-	१८,७२,०००/-	विद्यापीठाच्या ग्रंथालयाचे अद्ययावतीकरण व पर्जन्य सुगी (Rain Water Harvesting) यंत्रणेचे बांधकाम
३	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर	२८,००,०००/-	५,५७,७०७/-	खेळाचे साहित्य
४	सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे	२८,००,०००/-	निरंक	यापुर्वीच या रकमेची प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे.
५	मुंबई विद्यापीठ, मुंबई	२८,००,०००/-	१९,०५,०००/-	विद्यापीठाच्या प्रयोगशाळेची उपकरणे
६	शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	२८,००,०००/-	निरंक	यापुर्वीच या रकमेची प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे.
७	उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव	२८,००,०००/-	७,१२,१००/-	खेळाचे साहित्य
८	एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई	२८,००,०००/-	१०,४७,४२६/-	संगणक / लॅपटॉप
९	स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड	२८,००,०००/-	३५,२१,०००/-	खेळाचे साहित्य
	एकूण	**२,५२,००,०००/-**	**१,१३,०१,४६२/-**	

आदेश -

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र. २ अन्वये वितरीत करण्यात आलेल्या रु. २ कोटी ५२ लक्ष इतक्या निधीच्या प्रमाणात प्राधान्यक्रमाने करावयाच्या कामांना वर नमुद केल्याप्रमाणे खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून संबंधित विद्यापीठांना मंजूरी देण्यात येत आहे.

१) परिशिष्ठामध्ये नमूद करण्यात आलेल्या बांधकाम व नुतनीकरण कामांना आपल्या स्तरावर तांत्रिक व प्रशासकिय मंजूरी प्रदान करावी.

२) खरेदी करावयाच्या कामांना विद्यापीठांनी आवश्यकतेनुसार तांत्रिक मंजूरी प्रदान करावी.

३) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत अकृषी विद्यापीठांनी प्रदान केलेल्या तांत्रिक व प्रशासकीय मंजूरीच्या बांधकामांची त्यांच्या विहित नियमानुसार प्रत्यक्ष अंमलबजावणी ही सद्यस्थिती विद्यापीठनिहाय प्रचलित कार्यपध्दतीनुसार सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अथवा स्वत:च्या अभियांत्रिकी विभागाकडून करण्यात यावी.

४) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत सर्व अकृषी विद्यापीठांनी वित्तीय अधिकार त्यांच्या विद्यापीठ लेखा संहितेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत वापरावी. तसेच शासनाने उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या दि. ३०/१०/२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदरची खरेदी प्रक्रिया विद्यापीठांनी आपल्या स्ततावर पार पाडावी. या संदर्भातील सर्व प्रचलित अटी व शर्तीचे पालन करण्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यापीठाची राहिल.

५) बांधकाम, नुतनीकरण किंवा खरेदी करण्यात येणाऱ्या प्रत्येक बाबीवर राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) योजनेचा लोगो स्वंतत्र रित्या प्रथम दर्शनी दिसेल अशा स्वरुपात लावणे अनिवार्य आहे.

६) विद्यापीठांनी विहित कालावधीमध्ये वितरीत करण्यात आलेला खर्च पुर्णपणे करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी. विद्यापीठांने ज्या उद्दिष्ठासाठी मंजूर केलेल्या अनुदानाचा वापर त्याच उद्दिष्ठासाठी करावा आणि त्याबाबतचे विनियोग प्रमाणपत्र (Utilization Cartificate) केंद्र शासनाच्या विहित नमुन्यामध्ये प्रकल्प संचालनालयास वेळेत सादर करणे बंधनकारक आहे.

७) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत प्राप्त निधीचे लेखापरिक्षण करुन अहवालाची प्रत प्रत्येक वर्षी रुसा कार्यालयास पाठविण्यात यावी. तसेच रोख वही स्वतंत्रपणे ठेवण्यात यावी.

८) विद्यापीठांनी रुसा योजने संदर्भातील सर्व कागदपत्रे, लेखापरिक्षण अहवाल इ. संबंधित अधिकाऱ्यांना तपासणीस उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

९) विद्यापीठांनी पुरवठादारास/ कंत्राटदारास त्यांना अदा करावयाची देयकाची रक्कम PFMS द्वारे त्यांच्या बँक खात्यात वर्ग करावी.

१०) या आदेशान्वये रु. २ कोटी ५२ लक्ष इतका निधी PFMS द्वारे संबंधित विद्यापीठाच्या रुसा बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येत आहे.

११) खेळाचे साहित्य संचालनालयास सादर केलेल्या यादीमधून खरेदी करणे बंधनकारक राहील.

सा/-
सहसंचालक
राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान (रुसा)

प्रति-

१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ, नागपुर
४) कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडेर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
५) कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
६) कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
७) कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
८) कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
९) कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
१०) कुलसचिव, एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई
११) कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
१२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-१/२ महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर
१३) महालेखापाल, (लेखा व परिक्षण)-१/२ महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर
१४) उपसंचालक (वित्त), राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान
१५) निवड नस्ती (रुसा)

सहसंचालक
राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान (रुसा)